# वादग्रस्त प्रकल्पांची चौकशी सुरूच राहणार - जलसंपदा राज्यमंत्री

## मात्र रखडलेल्या प्रकल्पांच्या फेरनिविदा सरकार काढणार – विजय शिवतारे

मुंबई, शुक्रवार (विशेष प्रतिनिधी) – राज्यातील ज्या सिंचन प्रकल्पांची चौकशी सुरू आहे, ती सुरूच राहील . मात्र ज्या प्रकल्पांची कामे रखडली आहेत, अशा प्रकल्पांसाठी फेरनिविदा काढण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत सांगितले. त्याचबरोबर राज्यातील सिंचनाच्या सर्व स्त्रोतांमधून नेमके किती हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे याची आकडेवारी सिंचन स्त्रोताच्या वर्गवारीसह महिन्याभराच्या आत जलसंपदा यंत्रणेला उपलब्ध करून देण्याचे आदेशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या आढावा बैठकीत दिल्याचे शिवतारे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज जलसंपदा विभागाची आढावा बैठक झाली. या बैठकीत काही महत्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. याची माहिती सांगताना शिवतारे म्हणाले की राज्यातील सिंचनाचे जे प्रकल्प वादात आहेत. ज्यांची चौकशी सुरू आहे. अशा प्रकल्पांचे भौतिक व आर्थिक मुल्यांकन करून सध्याच्या स्थितीत कंत्राटदारांचे कंत्राट रद्द करण्यात येणार आहे. यानंतर उर्वरित कामांचे भौतिक व आर्थिक मुल्यांकन करून त्याच्या लवकरात लवकर फेरनिविदा काढण्यात येणार आहेत. शासनाच्या या धोरणामुळे रखडलेल्या प्रकल्पांना गती येणार आहे. यामध्ये जे प्रकल्प तीन वर्षांत प्रत्यक्ष क्षेत्र ओलीताखाली आणतील अशा प्रकल्पांना प्राधान्यांने पूर्ण करण्यासाठी सरकार कटीबद्ध राहणार आहे. या प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी नाबार्ड, आदी वित्तिय संस्थांच्या माध्यमातून ३० हजार कोटींचे कर्ज उभारण्यात येणार आहे. वित्तीय संस्थांसह कर्जरोख्याची उभारणी करण्यात येणार आहे. तसेच आयुर्विमा महामंडळ, हुडको या संस्थांकडूनही वित्तीय मदत घेतली जाणार आहे. तसेच एआयबीपी अंतर्गत केंद्राची मदत घेतली जाणार आहे. त्याचबरोबर बीओटी तत्वानेही काम केले जाणार आहे. अॅन्युटी तत्वावर या प्रकल्पांचे कामे पूर्ण केली जाणार आहेत, अशी माहिती शिवतारे यांनी दिली.

राज्यात एकूण सिंचनाचे पूर्ण प्रकल्प ३१८६ असून बांधकामाधीन प्रकल्पाची संख्या ३७६ आहे. तर एकूण सिंचन क्षमता ४८.६६ लक्ष हेक्टर आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई कार्यक्रमांतर्गत एकूण २६ प्रकल्प आहेत. नागपूर विभागात एकूण ८० प्रकल्प, मराठवाड्यात १०५ प्रकल्प आहेत तर अवर्षणप्रवण भागातील एकूण सात प्रकल्प सिंचनाचे आहेत.

### ओलिताखालील क्षेत्राची आकडेवारी महिन्याभरात उपलब्ध होणार

आत्महत्याप्रवण १४ जिल्ह्यांतील व दुष्काळी भागातील अपूर्ण सिंचन प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी कामाला लागावे असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. सिंचनाची व्यवस्थित आकडेवारी तयार करुन पुढील तीन वर्षाचे नियोजन करावे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील

टेंभी सिंचन प्रकल्पाच्या कामाला गती द्यावी. राज्यातील किती जमीन ओलीताखाली आहे हे तपासून पाणी वापरणाऱ्यांना मीटर बंधनकारक करता येईल का, याची चाचपणी करावी. याबाबत महिन्याभरात ओलिताखाली क्षेत्राची आकडेवारी महिन्याभरात उपलब्ध होणार असल्याची माहिती शिवतारे यांनी दिली.

# रस्ते विकासाचा अनुशेष भरून काढा – मुख्यमंत्री

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – राज्यामधील रस्ते विकास करताना कोणताही अनुशेष ठेवू नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डी. के. जैन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव आशिषकुमार सिंह, सचिव (इमारत) सी. पी. जोशी, सचिव (रस्ते) ए. बी. तामशेखर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यातील जमिनींची माहिती घेतली. तसेच राज्यात रस्ते विकासासाठी न्युईटी धोरणासंदर्भात आढावा घेतला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यातील रस्त्यांच्या बळकटिकरणासाठी न्युईटी धोरणाचा वापर करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. या धोरणानुसार राज्यातील २१ हजार २५ रस्त्यांची दुरुस्ती, बांधणी करण्यात यावी. यामाध्यमातून रस्ते विकासाला चालना देण्यात यावी. या धोरणानुसार वेगळा निधी उभारण्यासाठीचा प्रस्ताव तयार करावा. तसेच त्यामध्ये रस्ते विकासासाठी राज्यातील सर्वच विभागातील रस्त्यांचा समावेश करावा. येत्या तीन वर्षात ही कार्यवाही पूर्ण करावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील राज्यात किती जागा आहेत, त्यांची परिस्थिती काय आहे, याचा विचार करून त्या जागांचा विकास करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. पाटील यांनी न्युईटी धोरणाचा वापर करून रस्ते विकास करावेत, असे सांगितले.

# महाराष्ट्रासह देशभरातील चारशे रेल्वे स्थानकांचा कायापालट – सुरेश प्रभू

नवी दिल्ली/मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) – पुण्यातील शिवाजी नगर रेल्वे स्थानकासह देशभरातील ४०० रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याची योजना रेल्वे मंत्रालयाने आखली असल्याची माहिती रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी आज दिली. यात महाराष्ट्रातील तीस ते चाळीस प्रमुख रेल्वे स्थानकांचा समावेश केला जाणार असून त्यांची नावे अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील प्रलंबित रेल्वे प्रकल्प संयुक्त उपक्रमाच्या (जेव्हीसी) माध्यमातून पूर्ण केले जाणार असल्याची माहिती सुरेश प्रभू यांनी आज पत्रकारांशी बोलताना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला दोन वर्षे पूर्ण होत असून या दोन वर्षांत रेल्वेने केलेल्या कामकाजाची माहिती रेल्वेमंत्र्यांनी आज पत्रकारांशी बोल– ताना दिली. केंद्र आणि महाराष्ट्र सरकारची संयुक्त कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून दोन महिन्यात ही कंपनी कामाला सुरवात करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात रेल्वे मंत्रालयाने प्रचंड कामे केली आहेत. मात्र, हा बदल प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी सन २०२०ची वाट बघावी लागेल. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी २०१४ ते २०१७ या कालावधीसाठी ३५८७ कोटी रूपये मंजूर केले आहेत. सध्या राज्यात ३५ प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून यात १० नवीन रेल्वेमार्ग, फोर गेज परिवर्तन आणि २१ मार्गांच्या दुपरीकरणाचा समावेश आहे. दरम्यान, केंद्र आणि महाराष्ट्राच्या संयुक्त कंपनीच्या माध्यमातून मुंबईची इलेवेटेड रेल्वे, अहमदनगर–बीड़–परळी, वर्धा–यवतमाल–नांदेड़, पुणे–नासिक, मनमाड़–धुळे–इंदूर, लोणंद–बारामती, वैभववाड़ी–कोल्हापूर, गड़चांदूर–अदिलाबाद, वड़सा–गड़चिरोली, नागपुर–नागभिड़ या मार्गांचा समावेश आहे.

# छगन भुजबळ यांची नव्याने वैद्यकीय तपासणी करण्याचे आदेश

**जामीन अर्जावर २७ मे ला सुनावणी**

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी) – महाराष्ट्र सदनासह अनेक गैरव्यवहारांप्रकरणी मनी लॉडरिंग कायद्यांतर्गत अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांच्या दोन रूग्णालयांच्या विसंगत वैद्यकीय अहवालाची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. भुजबळ यांची जे.जे. रुग्णालयाच्या त्रिसदस्यीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीने वैद्यकीय तपासणी करून २७ मे रोजी न्यायालयात अहवाल सादर करावा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय गडकरी यांनी आज दिले.

गेले दोन महिने अटकेत असलेल्या छगन भुजबळ यांनी 'इडी'च्या विशेष न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर सुमारे ११ व्याधींनी ग्रस्त असलेल्या ६९वर्षीय छगन भुजबळ यांच्यावतीने अॅड्. अभय मोकाशी यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी भुजबळ यांच्या वतीने अॅड्. अमित देसाई आणि हर्षद पोंडा यांनी भुजबळ यांचा हिंदूजा हाॅस्पिटलचा वैद्यकीय अहवाल सादर केला तर सरकारच्या वतीने अॅड्. पौर्णिमा कंथारिया यांनी जामीनअर्जाला जोरदार विरोध केला. 'ईडी'च्या विशेष न्यायालयाने सेंट जॉर्जच्या वैद्यकीय अहवालाच्या आधारेच जामीन फेटाळला असल्याचे न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले. या दोन्ही वैद्यकीय अहवालांमध्ये विसंगती आढळल्याने न्यायालयाने जे.जे. हाॅस्पिटलच्या अधिष्ठातांनी भुजबळ यांच्या वैद्यकीय तपासणीकरिता तीन तज्ज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करावी. या समितीसमोर २४ मे रोजी कारागृह प्रशासनाने भुजबळ यांना तपासणीसाठी हजर करावे. समितीने नव्याने वैद्यकीय तपासणी करून सीलबंद वैद्यकीय अहवाल द्यावा, तो तपास अधिकाऱ्यांनी २७ मे रोजी न्यायालयात सादर करावा, असे आदेश न्यायालयाने दिले. तोपर्यंत जामीन अर्जाची सुनावणी तहकूब ठेवण्यात आली आहे.

**सर्व आजारांची तपासणी होणार**

मधुमेह, दमा, रक्तदाब, हृदयातील अडथळ्यांसह सुमारे ११ व्याधींनी ६९वर्षीय छगन भुजबळ यांना ग्रासले आहे. या सर्व आजारांची वैद्यकीय तपास–सणी व्हावी अशी विनंती अॅड्. अमित देसाई यांनी केली असता, न्यायालयाने ती मान्य केली.

# पुणे, सोलापूर स्मार्टसिटीसाठी करीर, म्हैसकर यांची नियुक्ती

**मनपाच्या कारभारात राज्य सरकारचा हस्तक्षेप**

मुंबई, शुक्रवार (विशेष प्रतिनिधी) – पुणे व सोलापूर महान–गरपालिकेत काँग्रेस, राष्ट्रवादी यांची सत्ता व तेथील महानगरपालिका प्रशासन अत्यंत संवेदनाशील असताना या दोन शहरांच्या स्मार्टसिटीसाठी मंत्रालयातून नगरविकास सचिव नितिन करीर व मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती झाल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हा सरळ सरळ महानगरपालिकांच्या कारभारामध्ये राज्य सरकारचा हस्तक्षेप असल्याचे म्हटले जात आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी–काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष असून त्यांच्याच पक्षाचा महापौर व काँग्रेसचा उपमहापौर आहे. सोलापूरमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. या पार्श्वभूमीवर स्मार्टसिटी योजना राबविण्याचे काम हे त्या महापालिकांचे असताना राज्य सरकारने मात्र यात हस्तक्षेप करून नितिन करीर व मिलिंद म्हैसकर यांना पाठविले आहे. नितिन करीर हे यापूर्वी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त होते. हे दोन्ही अधिकारी मुख्यमंत्र्यांचे निकटचे संबंधी असून या नियुक्त्यांमुळे महानगरपालिकेच्या कारभारामध्ये हस्तक्षेप केल्याची उघड चर्चा गेले दोन दिवस सुरु आहे. पुणे महानगरपालिका आयुक्त हे अत्यंत सक्षम असे अधिकारी म्हणून ओळखले जातात. मग अचानकपणे करीर यांना तेथे पाठविण्याची राज्य सरकारला गरज का भासली, असा सवाल केला जात आहे.

सोलापूरमध्येही तीच स्थिती आहे. स्मार्टसिटीसाठी केंद्राची व राज्याची मदत येत असल्याचे कारण दाखवून या दोन नियुक्त्या करण्यात आल्याचे सांगण्यात येते. तर यापूर्वी जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान योजने (जेएनयुआर) साठी केंद्र सरकार ९० टक्के पैसे देत होते. त्या योजना महानगरपालिकाच राबवित होत्या. या योजनेअंतर्गत शहरे स्वच्छ करणे, वाहतपक व्यवस्था सुरळीत करणे, वॉटर सेव्हरेजसाठी हा निधी दिला जात होता. त्याची अंमलबजावणी राज्यातील महानगरपालिका व्यवस्थित करत असताना आता स्मार्ट सिटीच्या नावाखाली राज्य सरकारचा जो हस्तक्षेप केला जातो त्याला स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात विरोध केला जात आहे.

# दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसानिमित्त मंत्रालयात मुख्यमंत्र्यांनी दिली प्रतिज्ञा

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावरील दहशतवादी हल्ल्याचा विरोध म्हणून दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस पाळण्यात येतो. या दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिज्ञा दिली.

मंत्रालय, मुख्य इमारतीच्या परिसरात श्री. फडणवीस यांनी प्रारंभी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिज्ञा दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री प्रविण पोटे–पाटील, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव प्रमोद नलावडे, जलसंधारण विभागाचे सचिव प्रभाकर देशमुख, माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक देवेंद्र भुजबळ यांच्यासह वरिष्ठ अधिकारी– कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त घेतलेली प्रतिज्ञा – आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवीत आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करु.

# क्रिकेट क्लब ऑफ इंडियाकडून जलयुक्त शिवारासाठी २५ लाखांचा धनादेश

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेसाठी क्रिकेट क्लब ऑफ इंडियाने मदतीचा हात दिला आहे. क्लबच्या सदस्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन २५ लाख रुपयांचा धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला.

'वर्षा' निवासस्थानी झालेल्या यावेळी सीसीआयचे अध्यक्ष किकू निकोल्सन, उपाध्यक्ष नवल परडोले, कार्यकारी समिती सदस्य राकेश कपूर, श्रीकांत सोमाणी, खजिनदार प्रेमल उदानी, सामाजिक उत्तरदायित्व विभागाचे प्रमुख राजेश हिरानंदानी आदी उपस्थित होते.

**REMSONS Industries Limited**

(सीआयएन : एल५१९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१)
८८–बी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रिअल इस्टेट, कांदिवली (पश्चिम), मुंबई – ४०००६७
दूर. क्र. : (०२२) २८६८ ३८८३
फॅक्स क्र. : (०२२) २८६८ २४८७
ई–मेल : remsons@vsnl.com
वेबसाईट : www.remsons.com

**सूचना**

**सेबी** (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) नियमावली, २०१५ च्या नियमावली २९ आणि ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा **शनिवार, दि. २८ मे, २०१६** रोजी **इतर गोष्टींसह** दि. ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिताच्या लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना विचारात घेऊन आणि मंजुरी देण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे. सदर माहिती ही बीएसई लि. च्या **(www.bseindia.com)** या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि. च्या **(www.nseindia.com)** या जेथे कंपनीचे शेअर्स सूचीबध्द आहेत आणि कंपनीच्या म्हणजेच **(www.remsons.com)** या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

रेमसन्स इंडस्ट्रीज लि. करिता
सही/–
ठिकाणः मुंबई — सुखदेव पुरोहित
दिनांकः २०.०५.२०१६ — कंपनी सचिव

**APPLE FINANCE LIMITED**

Regd. Office: 8 Apeejay House, 130 Mumbai Samachar Marg, Mumbai 400 023
CIN: L65910MH1985PLC037767
Tel.: 91+22-2288 6100 Fax: 2288 6106
Email: info@applefinance.co.in
www.applefinance.co.in

**NOTICE**

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of Apple Finance Limited will be held on Monday, May 30, 2016 inter alia to consider and approve the audited standalone and consolidated financial results for the quarter/year ended March 31, 2016.
The above details can be viewed on the Company's website www.applefinance.co.in as well as on the website of BSE Limited www.bseindia.com.

For Apple Finance Limited
P. B. Deshpande
Company Secretary
Place: Mumbai
Date : 20.05.2016

**विनादित्य ट्रेडिंग कंपनी लिमिटेड**

सीआयएन : एल५१९००एमएच१९८१पीएलसी०२४३४०
नों. कार्यालय : १२, ४था मजला, ६८, साई सदन, जन्मभूमी मार्ग, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई – ४००००१, महाराष्ट्र.
दू. क्र. : ०२२–२२८२८६६१
फॅक्स : +९१–२२–२४९३९५६७
ई–मेल : info@aacs.in
वेब : www.vinaditya.com

**संचालक मंडळाच्या बैठकीसाठी सूचना**

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ (१) ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यांत येते की, ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी कंपनीच्या लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना विचारात घेऊन, चर्चा करून मंजूर करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक शनिवार, २८ मे, २०१६ रोजी होणार आहे.
ही माहिती, कंपनीची वेबसाईट www.vinaditya.com वर पाहता येईल आणि स्टॉक एक्सचेंज ची वेबसाईट www.bseindia.com वर देखील पाहता येऊ शकेल.
ठिकाण : मुंबई
दिनांक : २०/०५/२०१६

**विनादित्य ट्रेडिंग कंपनी लिमिटेड साठी**
संचालक मंडळाच्या आदेशावरून
**(सही/–)**
**रवीकुमार बोघम**
कंपनी सेक्रेटरी

**Laffans PETROCHEMICALS LIMITED**
AN ISO 9002 CO.
Regd. Office: Shed No. C1B/316 GIDC, Panoli, Ankleshwar, Dist. Bharuch Gujrat- 394116

**NOTICE**

NOTICE is hereby given pursuant to regulation 47(1) if SEBI Regulations, 2015 that a meeting of Company Directors will be held on Monday, May 30th, 2016 at 3 pm to approve of Audited Financial Results for the year ended 31st March 2016
Information also hosted on www.laffanspetrochemical.com and may also be accessed on www.bseindia.com

For & Behalf of the Board
Sd/-
Managing Director
Place: Mumbai
Date: 18th May, 2016

**नितिन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेड**

(सीआयएन–एल२९३१९३एमएच१९९५पीएलसी०९२३२३)
नो.का.: ८०१ व ८०२, सी – विंग, निळकंठ बिझनेस पार्क, किरोळ रोड, विद्याविहार (प.), मुंबई–४०००८६.
दू.क्र.: ०२२–४०४५७००० – फॅक्स क्र.: ०२२–२५७०१११०
ई–मेल: nitinfire@vsnl.com; वेबसाईट: http//www.nitinfire.com

**सूचना – संचालक मंडळाची सभा**

**सेबी** (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९ ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष (अलिप्त आणि एकत्रित) अन्य बाबींसह विचारात घेऊन मंजूर करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची एक सभा सोमवार, ३० मे, २०१६ रोजी दु. १.०० वा. त्यांच्या शाखा कार्यालयात ५०१, डेल्टा, टेक्नॉलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई–४०००७६ येथे होणार आहे. ही माहिती कंपनीची वेबसाईटस् म्हणजेच – www.nitinfire.com आणि स्टॉक एक्स्चेंजेसची वेबसाईट म्हणजेच – www.bseindia.com व www.nseindia.com वर देखील पाहता येईल.

| | |
|---|---|
| ठिकाण: मुंबई<br>दिनांक: २०.०५.२०१६ | **नितिन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रीज लिमिटेडसाठी**<br>**सही/–**<br>**श्रबन कुमार करन**<br>**कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी** |

**विजया बँक VIJAYA BANK**

**अॅसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा**
(भारत सरकारचा उपक्रम)
# १८/बी, ३रा मजला, रोहित चेंबर्स, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई– ४००००१.
ईमेल : vb5046@vijayabank.co.in, दूरध्वनी क्र. ०२२–२२०२६६१३/०२२–२२०२६६१४

**ई–लिलाव विक्री सूचना**

सर्व संबंधितांना सूचित करण्यात देण्यात येते की, खालील मिळकती (१) विजया बँक (२) स्टेट बँक ऑफ इंडिया (३) बँक ऑफ इंडिया (४) आयसीआयसीआय बँक (५) अॅक्सिस बँक (६) युनियन बँक ऑफ इंडिया (मे. इन्व्हेन्ट अॅसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड) यांच्या नावे तारण आहेत आणि तारण धनको या नात्याने सरफैसी अॅक्ट, २००२ अंतर्गत कब्जा घेतला असून, दिनांक २७.०६.२०१६ रोजी वेळः ११.०० ते ०१.०० **'जेथे आहे जसे आहे आणि जेथे जसे आहे'** तत्वावर बँकेच्या थकितांच्या वसुलीकरिता विक्री करण्यात येईल. सदर सूचना खालील नमूद कर्जदार/रांना आणि हमीदार/रांना जर थकीत रकमेचा भरणा लिलावाच्या तारखेपर्यंत केला गेला नाही तर सदर कर्जासंबंधी सदर तारखेस ई–लिलाव विक्री घेण्यासंबंधी देण्यात येत आहे.

**कर्जदार आणि हमीदारांचे नाव आणि पत्ता :**

| **कर्जदार :** | **हमीदार:** |
|---|---|
| मे. हायड्रोएअर टेक्टॉनिक्स (पीसीडी) लि. ए–११६, रहेजा आर्केड, प्लॉट क्र. ६१, सेक्टर–११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००६१४. | १. श्री. हरभजन सिंग, फ्लॅट क्र. १२०१, सी वूड इस्टेट, सेक्टर ५४, ५६, ५८ नेरुळ, नवी मुंबई–४००७०६<br>२. श्रीमती राजकुमारी सिंग, फ्लॅट क्र. १२०१, सी वूड इस्टेट, सेक्टर ५४, ५६, ५८ नेरुळ, नवी मुंबई–४००७०६<br>३. मे. प्रिया सीईटीपी लि., प्लॉट क्र. पी–५८, पाताळगंगा इंडस्ट्रिअल एरिया, वासंबे गाव, तालुका खालापूर, जिल्हा रायगड. |

खालील नमूद मिळकत **वेबसाईटद्वारे 'ऑनलाईन ई–लिलावाद्वारे www.auctiontiger.net** दिनांक २७.०६.२०१६ **रोजी रक्कम रु. १९६,३६,१३,५९६/– (एकशे शहाण्णव करोड छत्तीस लाख तेरा हजार पाचशे शहाण्णव मात्र)** दिनांक ०१.१०.२०११ रोजीस त्यासह पुढील व्याज सांपार्श्विक दर त्यासोबत रक्कम, प्रभार, इतर संपूर्ण देयाच्या तारखेपर्यंतच्या वसुलीकरिता विकली जाणार आहे, सरफैसी अॅक्ट, २००२ आणि इतर अन्वये तारण मिळकतीच्या विक्रीमार्फत आधीच वसूल केलेली रक्कम वजाच्या अधीन आहे.

| | |
|---|---|
| **मिळकतीचे परिशिष्ट** | १. युनिट क्र. ११४ चे सर्व भाग आणि विभाग मोजमापित ५०३ चौ. फूट (चटई क्षेत्र) श्री. एच. बी. सिंग यांच्या मालकीचे १ ला मजला, बिल्डिंगचे नाव रहेजा आर्केड बांधीत त्या जमिनीचे सर्व भाग आणि विभाग त्या प्लॉट क्र. ६१ रोड क्र. डीबीसी सेक्टर क्र. ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.<br>२. युनिट क्र. ११५ चे सर्व भाग आणि विभाग श्री. आर. के. सिंग यांच्या मालकीचे मोजमापित ५०३ चौ.फूट (चटई क्षेत्र) १ ला मजला, बिल्डिंगचे नाव रहेजा आर्केड, बांधीत त्या जमिनीचे सर्व भाग आणि विभाग त्याचा प्लॉट क्र. ६१, रोड क्र. डीबीसी सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.<br>३. युनिट क्र. ११६ चे सर्व भाग आणि विभाग मोजमापित १४५४ चौ. फूट (चटई क्षेत्र) श्री. एच. बी. सिंग यांच्या मालकीचे १ ला मजला, बिल्डिंगचे नाव रहेजा आर्केड बांधीत त्या जमिनीचे सर्व भाग आणि विभाग त्या प्लॉट क्र. ६१ रोड क्र. डीबीसी सेक्टर क्र. ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई. |
| **राखीव रक्कम** | १. रु. ९८११२००/– (रु. अठ्याण्णव लाख अकरा हजार दोनशे मात्र)<br>२. रु. ९८११२००/– (रु. अठ्याण्णव लाख अकरा हजार दोनशे मात्र)<br>३. रु. १९५६४८००/– (रु. एक करोड पंच्याण्णव लाख चौसष्ट हजार आठशे मात्र) |
| **इसारा अनामत भरणा** | १०% राखीव किंमतीच्या म्हणजे रु. ९,८१,१२०/– (रुपये नऊ लाख एक्याऐंशी हजार एकशे वीस मात्र) मिळकत क्र. १ आणि मिळकत क्र. २ प्रत्येकीकरिता. रु. १९,५६,४८०/– (रुपये एकोणीस लाख छप्पन्न हजार चारशे ऐंशी मात्र) मिळकत क्र. ३ करिता. |
| **बोली वाढविण्याची रक्कम** | रु. १,००,०००/– (रुपये एक लाख मात्र) किंवा सदरच्या पटीत. |
| **इच्छुक खरेदीदाराकरिता मिळकतीच्या तपासणीची तारीख** | ०९.०६.२०१६ रोजीस स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत. |
| **निविदा अर्जासह इएमडी आणि केवायसी कागदपत्र सादर करण्याची अंतिम तारीख** | २४.०६.२०१६ रोजी सं. ५.०० वा. पर्यंत |
| **ऑनलाईन प्रस्ताव उघडण्याची तारीख, ठिकाण आणि वेळ** | दिनांक २७.०६.२०१६ वेळ : स. ११.०० ते दु. ०१.०० पर्यंत ऑनलाईन ई–लिलाव **www.auctiontiger.net** या वेबसाईटद्वारे. |

**सूचना: इच्छुक बोलीदार/ खरेदीदार बँक वेबसाईट www.vijayabank.com येथे 'निविदा' येथे क्लिक करावे आणि शासकीय वेबसाईट www.tenders.gov.in येथे लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींच्या तपशिलांकरिता भेट द्यावी.**

**स्थळ: मुंबई** — **सही/–**
**दिनांक: २०.०५.२०१६** — **प्राधिकृत अधिकारी**
**विजया बँक, एआरएम शाखा, मुंबई**

**सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया Central Bank of India**
१९११ से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

**बॅलार्ड इस्टेट शाखा :** मार्शल बिल्डिंग, शूरजी वल्लभदास मार्ग, मुंबई–४००००१. फोन : ०२२–२२६१६१२७/२२६३०७३७,
फॅक्स : ०२२–२२६१२२१९, ई–मेल : agmmums0597@centralbank.co.in

१. **मे. देव ब्लेसिंग ट्रेडर्स प्रा. लि.**
बिल्डिंग क्र. १४१, खोली क्र. ३८२४, पंतनगर, ओमनिवास सीएचएसएल, साईबाबा मंदिराजवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई–४०००७५.
२. **श्री. नरेश रमणिकलाल ढोलकिया**
फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, अलकापुरी को–ऑप. हाऊ. सोसा. लि., कल्पतरू टॉवरसमोर, आकुर्ली क्रॉस रोड क्र. ३, आकुर्ली, कांदिवली (पू.), मुंबई–४००१०१.
३. **श्री. जनक अमृतलाल भिमानी**
फ्लॅट क्र. ४, बिल्डिंग क्र. २८७/ए, ज्योती सदन सीएचएसएल, सायन रोड, सायन पूर्व, मुंबई–४०००२२
४. **श्री. सुनिल मोतिराम खोंडे**
रो हाऊस क्र. २५, गौरव एन्क्लेव्ह रो हाऊस को–ऑप. हाऊ. सोसा. लि., प्लॉट क्र. ०१, जीसीसी क्लबजवळ, मंगल नगर रोड, मिरा रोड (पू.), ठाणे ४०११०७.
५. **श्री. किरिट अमृतलाल भिमानी**
फ्लॅट क्र. ३८२४, बिल्डिंग क्र. १४१, ओम निवास सीएचएस, वल्लभबाग लेन (एक्स्टें.) पंतनगर, घाटकोपर पूर्व, मुंबई–४०००७५.
६. **श्री. मयुर एन. पटेल**
फ्लॅट क्र. ए–७०४, ७ वा मजला, ए विंग, शिवपार्वती को–ऑप. हाऊ. सोसा. लि., ग्रीन हॉटेलजवळ, अहिंसा मार्ग, चिंचोली बंदर रोडलगत, मालाड (प.), मुंबई–४०००६४.
७. **श्रीमती प्रिती मयुर पटेल**
फ्लॅट क्र. ७०४, ७ वा मजला, ए विंग, शिवपार्वती को–ऑप. हाऊ. सोसा. लि., ग्रीन हॉटेलजवळ, अहिंसा मार्ग, चिंचोळी बंदर रोडलगत, मालाड (प.), मुंबई–४०००६४.

**संदर्भ : (मे देव ब्लेसिंग ट्रेडर्स प्रा.लि. यांचे कर्ज खाते क्र. ३२९७९१८७८०**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना**

१. आम्ही आमच्या बॅलार्ड इस्टेट शाखेमार्फत हमीदार म्हणून त्यांच्या क्षमतेत प्रेषिती क्र. ७ यांच्या विनंतीनुसार आणि प्रेषिती क्र. १ चे हमीदार आणि संचालक म्हणून त्यांच्या क्षमतेत प्रेषिती क्र. २ ते ७. यांच्या विनंतीनुसार आणि तुमच्या विनंतीनुसार प्रेषिती क्र. १ (मुख्य कर्जदार) म्हणजेच तुम्हाला खालील पतसुविधा मंजूर केलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| सी/सी | रु. ४,००,००,०००/- |

२. खाते २९/१२/२०१५ रोजी एनपीए झाले आहे.
३. आम्ही तुम्हाला कळवित आहोत की, रु. ४,२७,५२,४३६/– (रुपये चार कोटी सत्तावीस लाख बावन्न हजार चारशे छत्तीस मात्र) च्या एकूण रकमेसह मासिक आधारे दरसाल १४.७०% दराने २८/०४/२०१६ पासूनचे व्याज आम्हाला २८/०४/२०१६ रोजीस थकीत आहे. कर्जदारांनी रु. ४,२७,५२,४३६/– (रुपये चार कोटी सत्तावीस लाख बावन्न हजार चारशे छत्तीस मात्र) ची अदा करण्यास कसूर केलेली आहे आणि त्यामुळे तुम्ही संयुक्तपणे आणि वेगवेगळी बँकेची थकबाकी अदा करण्यास जबाबदार आहात.
४. प्रदानाकरिता आम्ही वारंवार विनंती/मागणी करूनही रु. ४,२७,५२,४३६/– (रुपये चार कोटी सत्तावीस लाख बावन्न हजार चारशे छत्तीस मात्र) + मासिक आधारे दरसाल १४.७०% दराने २८/०४/२०१६ पासूनचे व्याजाची रक्कम अदा करण्यास कसूरवार ठरले आहात. तुम्ही तुमचे संपूर्ण दायित्व प्रदान करण्यास कसूर केल्यामुळे आम्ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे जारी केलेले निर्देश आणि/किंवा मार्गदर्शक तत्त्व/बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नॉन परफॉर्मिंग अॅसेट म्हणून तुमची थकबाकी वर्गीकृत करण्यात आली आहे.
५. आम्ही तुम्हाला हे देखील कळवतो की, आम्हाला येणे थकबाकी असलेल्या संपूर्ण रकमेच्या परतफेडीसाठी आम्ही वारंवार पाठवलेल्या मागणी सूचना आणि तोंडी केलेल्या विनंत्यानंतरही, कर्जदारांनी अजूनपर्यंत त्याचे प्रदान केलेले नाही.
६. तुम्हाला माहीत आहे की, आमच्याकडून मंजूर करण्यात आलेल्या वरील मर्यादा खालील मत्ता/तारण कराराने (तारण मत्ता) सुरक्षित केल्या आहेत.

१. **मिळकतीचे वर्णन**
**श्रीमती प्रिती मयुर पटेल आणि श्री. मयुर एन. पटेल यांच्या मालकीचा**
फ्लॅट क्र. ए–७०४, ७ वा मजला, ए विंग शिव पार्वती को–ऑप. हाऊ. सोसा. लि., ग्रीन हॉटेलजवळ, अहिंसा मार्ग, चिंचोळी बंदर रोडलगत, मालाड (प.), मुंबई–४०००६४.
उत्तर : रस्ता, — दक्षिण : निवासी बिल्डिंग
पूर्व : शिवगंगा बिल्डिंग, — पश्चिम : धीरज बसेरा बिल्डिंग.
२. **मिळकतीचे वर्णन**
**श्री. सुनिल मोतिराम खोंडे यांच्या मालकीचे**
रो हाऊस क्र. २५, गौरव एन्क्लेव्ह रो हाऊस को–ऑप. हाऊ. सोसा. लि., प्लॉट क्र. ०१, जीसीसी क्लबजवळ, मंगळ नगर रोड, मिरा रोड (पू.), ठाणे–४०११०७.
उत्तर : रस्ता, — दक्षिण : बिल्डिंग
पूर्व : रो हाऊस क्र. २६, — पश्चिम : रो हाऊस क्र. १९.
३. **मिळकतीचे वर्णन**
**श्री. नरेश आर. ढोलकिया यांच्या मालकीचा**
फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, अलकापुरी को–ऑप. हाऊ. सोसा. लि., कल्पतरू टॉवरसमोर, आकुर्ली क्रॉस रोड क्र. ३, आकुर्ली, कांदिवली (पू.), मुंबई–४००१०१.
उत्तर : कादंबरी बिल्डिंग, — दक्षिण : झोपडपट्टी क्षेत्र
पूर्व : अंतर्गत रस्ता, — पश्चिम : बिल्डिंग.

७. वर दिलेल्या कारणास्तव, आम्ही याद्वारे तुम्हाला ह्या सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीत आम्हाला तुमच्याकडून येणे असलेले तुमचे संपूर्ण दायित्व निभावण्यास सांगत आहोत. कसूर केल्यास, आम्ही वरील तारण मत्तांविरुध्द सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (अॅक्ट) च्या कलम १३(४) अन्वये उपलब्ध असलेल्या अधिकारांचा वापर करू. अॅक्टच्या कलम १३ (४) अन्वये आम्हाला उपलब्ध असलेल्या अधिकारांमध्ये अन्य बाबींसह, पुढील अधिकारांचा समावेश होतो. i) तारण मत्तेचे रोखीकरण करण्याकरिता भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याच्या अधिकारासह कर्जदारांच्या तारण मत्तेचा कब्जा घेणे. ii) तारण मत्तेचे रोखीकरण करण्याकरिता भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याच्या अधिकारासह कर्जदारांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन ग्रहण करणे. iii) आमच्याकडून (तारण धनको) कब्जात घेण्यात आलेल्या तारण मत्तेची व्यवस्था पाहण्याकरिता व्यवस्थापक म्हणून कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करणे आणि आम्ही केलेले कोणतेही हस्तांतरण हे हस्तांतरितींच्या नावे हस्तांतरित केलेल्या तारण मत्ते संबंधातील सर्व अधिकार असे असतील जणू ते हस्तांतरण तुम्ही केले आहे. iv) तुमच्याकडून कोणतीही तारण मत्ता ज्यांनी संपादित केली आहे आणि ज्यांच्याकडून तुम्हाला कोणतेही पैसे येणे आहेत किंवा येणे होणार आहेत, त्यापैकी तारण कर्जाच्या प्रदानासाठी पुरेसे ठरेल एवढे पैसे आम्हाला अदा करण्याकरिता लेखी नोटिसीने आवश्यक तेव्हा कोणत्याही समयी बोलावणे.
८. वर दिलेल्या अधिकारांचा वापर करून रोख झालेल्या रकमेतून, प्रथम आमच्या मते सुयोग्यरित्या केलेल्या सर्व खर्च, आकार व परिव्यय व त्याच्याशी अनुषंगिक कोणतेही परिव्यय भागवले जातील आणि दुसरे ह्या सूचनेच्या तारखेपासून प्रत्यक्ष रोखीकरणाच्या तारखेपर्यंत संविदात्मक दराने व्याजासह वर दिलेली आम्हाला येणे असलेली थकबाकी भागवण्यात वापरली जाईल व त्यानंतर शेष रक्कम उरल्यास, अधिकार व हितसंबंधांप्रमाणे ती घेण्यास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रदान केली जाईल व ती रक्कम प्राप्त करण्यास कोणीही हक्कदार नसल्यास तुम्हाला प्रदान करण्यात येईल.
९. कृपया ध्यानात ठेवावे की, ह्या सूचनेच्या प्राप्तीनंतर, तारण धनकोंच्या लेखी पूर्व संमतीखेरीज, तुम्ही ह्या सूचनेत उल्लेख केलेल्या कोणत्याही तारण मत्तांचे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करू शकत नाही. आम्ही तुमचे लक्ष सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ च्या कलम २९ कडे वेधत आहोत. ज्या नुसार अधिनियमाच्या तरतुदीचे तुम्ही उल्लंघन केल्यास १ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्हींची तरतूद आहे.
१०. आम्ही तुम्हाला हे देखील कळवितो की, सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये आम्ही कारवाई करत असलो तरी, एकतर (i) तुम्ही आणि/किंवा जामीनदार ह्यांच्याकडून थकबाकीच्या वसुलीसाठी कर्ज वसुली न्यायाधिकरण/न्यायालयात वाद/अर्ज/दावे दाखल करून लढण्याचे आणि/किंवा (ii) तारण मत्तांच्या विक्री रकमेतून संपूर्ण थकबाकी रकमेची संविदात्मक दराने व्याजासह परतफेड होऊ न शकल्यास बँकेला येणे असलेल्या उर्वरित थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी कर्ज वसुली न्यायाधिकरण/न्यायालयासमक्ष तुम्ही आणि/किंवा जामीनदारांविरुध्द प्रक्रिया सुरू करणे (iii) कायद्याच्या तरतुदींच्या अंतर्गत तुम्ही केलेल्या कृती किंवा त्रुटींसाठी तुम्ही आणि/किंवा जामीनदार ह्यांच्या विरुध्द फौजदारी कारवाई सुरू करणे.
११. सदर सूचना ही सरफैसी अॅक्ट अन्वये मागील कार्यवाही रद्द करून जारी करण्यात येत आहे.

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**दिनांक : २१/०५/२०१६.** — **सहाय्यक महाव्यवस्थापक**
**ठिकाण : मुंबई** — **बॅलार्ड इस्टेट शाखा**